# शेतकऱ्यांना दिलासा देणार कोण?

**दसरा म्हणजे वाईटावर चांगल्याचा विजय! अन्याय, अहंकार आणि दुष्कृत्यांवर मात करून सत्याचा विजय साजरा करण्याचा हा दिवस. रावणदहनातून वाईट प्रवृत्तींच्या अंताचा संदेश दिला जातो. मात्र, राजकारणात या परंपरेला आता वेगळेच वळण मिळाले आहे. रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यापेक्षा एकमेकांना रावण ठरवण्यातच राजकीय नेत्यांना अधिक रस असल्याचे चित्र कालच्या दसऱ्याने दाखवून दिले. विजयादशमीचा संदेश मागे पडला आणि राजकीय आरोपांच्या धमाक्यांनी मैदान गाजवले. दुसरीकडे, दुष्काळाच्या सावटाखाली उभ्या असलेल्या शेतकऱ्यांच्या संकटाकडे लक्ष देण्यासाठी राजकीय व्यासपीठांवर किती वेळ दिला गेला, हा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहिला. गेल्या काही महिन्यांपासून देशाच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप आणि आंदोलनांचे सत्र सुरू आहे.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विविध ठिकाणी आंदोलने होत आहेत. पुण्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या प्रकरणावरून विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडले. या घटना लोकशाहीतील पारदर्शकता, तरुणांचे भविष्य आणि प्रशासनाच्या उत्तरदायित्वाशी संबंधित आहेत. या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक असताना राजकीय संघर्षाच्या गदारोळात मूळ मुद्देच मागे पडत आहेत.दसऱ्याच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय हितासाठी विविध संस्था आणि राजकीय पक्षांनी एकत्र येऊन देशाच्या शत्रूंविरुद्ध लढण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही आंदोलनांचे राजकारण करण्याऐवजी समस्यांवर उपाय शोधण्याचा संदेश दिला. एकीकडे एकजुटीचा आग्रह आणि दुसरीकडे प्रत्यक्ष राजकारणात परस्परांवर कुरघोडी, हा विरोधाभास संपणार कधी? राष्ट्रीय हिताची भाषा केवळ भाषणांपुरती मर्यादित राहणार की जनतेच्या ज्वलंत प्रश्नांच्या सोडवणुकीतूनही ती दिसणार? महाराष्ट्रातील दसरा मेळाव्यांनी या राजकीय संघर्षाचे दर्शन घडवले. शिवसेनेच्या दोन गटांचे स्वतंत्र मेळावे म्हणजे पक्षाच्या वारशावर आणि राजकीय वर्चस्वावर सुरू असलेल्या संघर्षाचे प्रतिबिंब होते. अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यांत मुंडे विरुद्ध जरांगे असा सामना रंगला.आपापली ताकद दाखवण्याच्या प्रयत्नात राजकीय भाषणांना धार आली; मात्र राज्यासमोरील मूलभूत प्रश्नांवर किती ठोस चर्चा झाली? गर्दीची मोजदाद होईल, घोषणांची चर्चा होईल; पण सामान्य जनतेच्या पदरात काय पडले, याचाही हिशेब व्हायला हवा. आज देशातील अनेक भागांत अल निनोच्या प्रभावासह पावसातील कमतरतेमुळे दुष्काळाचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, वाढता उत्पादनखर्च आणि कर्जाचा भार यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला आहे. अशा वेळी राजकीय नेत्यांनी एकमेकांवर शब्दांचे बाण सोडण्यापेक्षा शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करणे गरजेचे आहे. पीक नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण, पात्र शेतकऱ्यांना वेळेत मदत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जनावरांसाठी चारा आणि रोजगाराच्या संधी यांसारख्या उपायांना प्राधान्य मिळायला हवे. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्याला आश्वासनांच्या भाषणांची नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. राजकारणात टीका अपरिहार्य आहे. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे आणि विरोधकांनी सरकारच्या निर्णयांवर बोट ठेवणे, ही लोकशाहीची ताकद आहे. मात्र, टीका धोरणांऐवजी केवळ वैयक्तिक संघर्षापुरती मर्यादित झाली, तर जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळणार कसा? आरोप करणे सोपे; पुरावे देणे, पर्याय मांडणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे कठीण. म्हणूनच राजकीय नेतृत्वाने शक्तिप्रदर्शनापेक्षा जनतेच्या प्रश्नांवर कामाचा हिशेब देण्याची तयारी दाखवली पाहिजे. दसऱ्याचा खरा अर्थ विरोधकांचा पराभव करणे एवढाच नाही, तर स्वतःमधील अहंकार, अन्याय आणि विवेकाचा अभाव यांवर विजय मिळवणे हाही आहे. विरोधकांना रावण ठरवण्यापूर्वी स्वतःच्या कृतींचे आत्मपरीक्षण करण्याची तयारी राजकीय नेते दाखवणार का? आज शेतकरी संकटात आहे, तरुणांना भविष्याची चिंता आहे आणि सामान्य नागरिक महागाईने त्रस्त आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधणे हेच खरे जनसेवेचे राजकारण आहे.रावणदहन दरवर्षी होईल; फटाक्यांचा आवाजही घुमेल. पण दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या घरातील चूल पेटली, तरुणांच्या भविष्याला दिशा मिळाली आणि जनतेचा व्यवस्थेवरील विश्वास वाढला, तरच विजयादशमीचा संदेश सार्थ ठरेल. अन्यथा राजकीय मैदानात प्रत्येक जण दुसऱ्याला रावण ठरवत राहील आणि संकटांशी झुंजणारी जनता मात्र मदतीची वाट पाहत राहील!**

# सण-उत्सव, तिथी-पंचांग आणि अंधानुकरण: विज्ञाननिष्ठ समाजाच्या निर्मितीची गरज

**सण कोणासाठी आणि कशासाठी?**

गरिबांच्या पोटाचा प्रश्न महत्त्वाचा की सणांच्या खर्चाचा? परंपरेचा आदर राखताना विवेकाला तिलांजली नको!

मानवी जीवन आनंदी व्हावे, माणसांमध्ये प्रेम, बंधुभाव आणि आपुलकी वाढावी, दुःख विसरून काही क्षण आनंदात घालवता यावेत, या हेतूने सण-उत्सवांची परंपरा निर्माण झाली असावी. मानवी समाजाच्या सांस्कृतिक प्रवासात सणांना महत्त्वाचे स्थान आहे. सणांमुळे कुटुंबातील सदस्य एकत्र येतात, नातेवाईकांच्या भेटीगाठी होतात, सामाजिक संबंध दृढ होतात आणि परंपरांचे जतन होते. या सकारात्मक बाजू नाकारता येणार नाहीत. मात्र, सण साजरे करण्याच्या पद्धतीचा विचार करताना आजच्या सामाजिक, आर्थिक आणि वैज्ञानिक परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

आज आपल्या देशात एकीकडे विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, डिजिटल क्रांती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात प्रगती होत आहे, तर दुसरीकडे समाजातील अनेक घटक अजूनही मूलभूत गरजांसाठी संघर्ष करीत आहेत. कुणाला दोन वेळचे जेवण मिळविण्यासाठी दिवसभर कष्ट करावे लागतात, तर कुणाच्या घरात सणाच्या दिवशी गोडधोड बनविण्यासाठी आवश्यक साहित्यही उपलब्ध नसते. अशा परिस्थितीत सणांच्या नावाखाली होणारा अवाजवी खर्च, धार्मिक विधींबाबतची भीती आणि परंपरांचे अंधानुकरण यांचा विचार करणे आवश्यक आहे.प्रश्न सण साजरे करण्याचा नाही; प्रश्न आहे तो सण साजरे करण्याच्या पद्धतीचा. प्रश्न श्रद्धेचा नाही; प्रश्न आहे तो श्रद्धेच्या नावाखाली निर्माण होणाऱ्या भीतीचा, आर्थिक शोषणाचा आणि विवेकशक्ती गहाण ठेवण्याचा. माणसाचे जीवन अधिक चांगले व्हावे, त्याच्या कुटुंबाला सुख मिळावे आणि समाजाची प्रगती व्हावी, हा सणांचा हेतू असेल, तर त्या हेतूला बाधा आणणाऱ्या प्रथांचे पुनर्मूल्यांकन केलेच पाहिजे. एका वर्षात ३६५ दिवस असतात, हे आपण शालेय शिक्षणापासून शिकत आलो आहोत. प्रत्यक्षात पृथ्वीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी सुमारे ३६५ दिवस आणि सहा तास लागतात. त्यामुळे कालगणनेत आवश्यकतेनुसार अधिवर्षाची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था खगोलशास्त्रीय निरीक्षणे आणि गणित यांच्या आधारे विकसित झाली.मानवाने काळाचे मोजमाप करण्यासाठी दिवस, महिने, वर्षे आणि विविध कालगणना पद्धती विकसित केल्या. सूर्याची गती, चंद्राच्या कला, ऋतूंचे चक्र आणि आकाशातील ग्रह-ताऱ्यांचे निरीक्षण यांचा वापर करून विविध संस्कृतींनी आपापल्या कालगणना विकसित केल्या. भारतीय पंचांग परंपरेतही तिथी, नक्षत्र, योग, करण आणि वार यांना महत्त्वाचे स्थान आहे.चंद्र आणि सूर्य यांच्या परस्पर स्थितीवर आधारित तिथींची गणना केली जाते. त्यामुळे तिथी आणि इंग्रजी दिनदर्शिकेतील तारीख यांचा मेळ प्रत्येक वेळी एकसारखा असेलच असे नाही. ही कालगणनेची एक पारंपरिक पद्धत आहे. तिचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. परंतु एखादी तिथी विशिष्ट कामासाठी शुभ आहे किंवा दुसरी तिथी अशुभ आहे, असा दावा केला जात असेल, तर त्या दाव्याचा आधार काय, हा प्रश्न विचारणेही तितकेच आवश्यक आहे.

एखाद्या विशिष्ट दिवशी केलेले काम यशस्वी होईल आणि दुसऱ्या दिवशी केलेले काम अपयशी ठरेल, असे ठामपणे सांगण्यासाठी पुराव्याची गरज असते. केवळ परंपरा, ऐकीव माहिती किंवा एखाद्या व्यक्तीचे मत यांना वैज्ञानिक सत्य मानता येत नाही. कालगणना ही एक गोष्ट आहे आणि त्या कालगणनेशी जोडलेल्या शुभ-अशुभ कल्पना ही वेगळी गोष्ट आहे. या दोन्हींमध्ये फरक समजून घेणे आवश्यक आहे.समाजातील श्रीमंत आणि संपन्न घटकांना सण साजरे करण्यासाठी मोठा खर्च करणे शक्य असते. घराची सजावट, नवीन कपडे, महागड्या भेटवस्तू, मिठाई, धार्मिक विधी आणि सार्वजनिक कार्यक्रम यांसाठी ते सहजपणे पैसा खर्च करू शकतात. परंतु रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुराला, अल्पभूधारक शेतकऱ्याला, शेतमजुराला किंवा हातावर पोट असणाऱ्या कुटुंबाला सण साजरा करताना अनेक आर्थिक मर्यादांचा सामना करावा लागतो.ग्रामीण भागातील एखाद्या कुटुंबाच्या घरात सणाच्या दिवशी पुरणपोळी बनविण्यासाठी गूळ, डाळ, पीठ आणि



तूप उपलब्ध आहे का? त्यांच्या विहिरीत पाणी आहे का? जनावरांसाठी चारा आहे का? मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागतो आहे का? कर्जाचे हप्ते थकले आहेत का? शेतातील पिकाला पुरेसे पाणी मिळाले आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे अधिक महत्त्वाचे नाही काय?

ज्या शेतकऱ्याच्या शेतात पाऊस पडलेला नाही, ज्याच्या विहिरीने तळ गाठला आहे आणि ज्याच्या पिकाचे नुकसान झाले आहे, त्याच्यासाठी सणाच्या तिथीपेक्षा पाण्याची उपलब्धता महत्त्वाची असते. ज्या शेतमजुराला आठवडाभर काम मिळालेले नाही, त्याच्यासाठी शुभमुहूर्तापेक्षा रोजगाराची संधी महत्त्वाची असते. ज्या आईला मुलांच्या पोटाची चिंता आहे, तिच्यासाठी धार्मिक विधींपेक्षा मुलांना पुरेसे अन्न मिळणे महत्त्वाचे असते.म्हणूनच सणांच्या चर्चेत समाजातील वंचित घटकांच्या वास्तवाला केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. सण आनंदाचे असतील, तर तो आनंद सर्वांना अनुभवता आला पाहिजे. काही लोकांनी हजारो रुपये खर्च करून रोषणाई करावी आणि दुसरीकडे काही कुटुंबांना दिवा लावण्यासाठी तेल विकत घेण्याचीही अडचण असावी, ही सामाजिक विषमता आपल्याला अस्वस्थ करायला हवी.सणांचा खरा आनंद केवळ खर्च करण्यात नाही, तर इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यात आहे. एखाद्या गरजू कुटुंबाला अन्नधान्य देणे, विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, आजारी व्यक्तीला उपचारासाठी मदत करणे किंवा पाण्याची समस्या असलेल्या गावात सामूहिक प्रयत्न करणे, हीदेखील आनंद साजरा करण्याची अर्थपूर्ण रूपे आहेत. धार्मिक श्रद्धा हा अनेकांच्या वैयक्तिक जीवनाचा महत्त्वाचा भाग असतो. प्रत्येक व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे. मात्र, कोणती पूजा कोणत्या दिवशी करावी, कोणत्या दिशेला तोंड करून बसावे, कोणत्या वेळी प्रवास करावा किंवा कोणत्या तिथीला विशिष्ट काम करावे, यासंबंधी विविध परंपरा आणि समजुती समाजात आढळतात.येथे एक साधा प्रश्न उपस्थित होतो : या नियमांचा आधार काय आहे? ते निसर्गाच्या नियमांवर आधारित आहेत का? त्यांचा मानवी जीवनावर प्रत्यक्ष परिणाम होतो, हे पुराव्याने सिद्ध झाले आहे का? की ते पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या रूढी आहेत? प्रत्येक परंपरा चुकीची आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. अनेक परंपरांमागे सामाजिक एकता, स्वच्छता, ऋतूचक्र, कृषिजीवन, पर्यावरणसंवर्धन आणि सामूहिक आनंद यांसारखे महत्त्वाचे हेतू असू शकतात. परंतु एखादी प्रथा केवळ जुनी आहे म्हणून ती कायम स्वीकारलीच पाहिजे, असा नियम नाही. काळानुसार तिचे मूल्यमापन करता आले पाहिजे.एखाद्या व्यक्तीने सांगितले की अमुक दिशेला तोंड करून पूजा केली नाही, तर संकट येईल; अमुक दिवशी प्रवास केला, तर अपघात होईल; किंवा अमुक विधी केला नाही, तर कुटुंबावर संकट कोसळेल, तर अशा विधानांकडे विवेकाने पाहिले पाहिजे. भीती निर्माण करून एखाद्याला विशिष्ट कृती करण्यास भाग पाडणे योग्य नाही.

श्रद्धा व्यक्तीला मानसिक आधार देऊ शकते. मात्र, श्रद्धेच्या नावाखाली निर्माण होणारी भीती व्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेत असेल, तिच्यावर अनावश्यक आर्थिक भार टाकत असेल किंवा तिला वैज्ञानिक विचारापासून दूर नेत असेल, तर त्या प्रवृत्तीवर प्रश्न उपस्थित करणे गरजेचे आहे.महान कवी केशवसुत यांच्या कवितेतील परिवर्तनवादी विचार आजही प्रेरणा देतात. त्यांच्या तुतारी या कवितेतून जुनाट विचारांना आव्हान देण्याची आणि नव्या युगाचे स्वागत करण्याची प्रेरणा मिळते. समाजाने केवळ भूतकाळाचे गौरवगान न करता वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी नवे विचार स्वीकारले पाहिजेत.एकविसाव्या शतकात राहणाऱ्या समाजाने विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे. मोबाइल फोन वापरणे, इंटरनेटवर माहिती मिळविणे, आधुनिक वैद्यकीय उपचार घेणे आणि वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा लाभ घेणे आपण सहज स्वीकारतो. मग जीवनातील इतर निर्णय घेताना पुराव्याला आणि विवेकाला महत्त्व देण्यास संकोच का करावा? रुग्णाला ताप आला, तर त्याने योग्य वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. शेतातील पीक रोगग्रस्त झाले, तर कृषितज्ज्ञांचा सल्ला आणि वैज्ञानिक पद्धतींचा वापर करणे गरजेचे आहे. पाणीटंचाई निर्माण झाली, तर जलव्यवस्थापन, पावसाचे पाणी साठविणे, भूजल पुनर्भरण आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर यावर भर दिला पाहिजे. या समस्यांवर केवळ पूजा किंवा विधी करून समाधान मिळेल, असे गृहीत धरणे धोकादायक ठरू शकते. विज्ञाननिष्ठ विचार म्हणजे परंपरांचा अपमान नव्हे.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

उलट, कोणती परंपरा समाजासाठी उपयुक्त आहे आणि कोणती हानिकारक ठरते, हे समजून घेण्याची क्षमता म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन. प्रश्न विचारणे, निरीक्षण करणे, पुरावे तपासणे आणि गरजेनुसार मत बदलणे, ही प्रगत समाजाची लक्षणे आहेत.सण, उत्सव आणि परंपरा या मानवी जीवनाला आनंद देण्यासाठी आहेत. त्या माणसाच्या दुःखात भर घालण्यासाठी किंवा त्याच्यावर आर्थिक बोजा टाकण्यासाठी नसाव्यात. कोणताही धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रम आयोजित करताना आपल्या परिसरातील गरजू कुटुंबांचा, शेतकऱ्यांचा, शेतमजुरांचा आणि विद्यार्थ्यांचा विचार केला पाहिजे.सण साजरे करण्यासाठी कर्ज काढावे लागत असेल, कुटुंबाच्या मूलभूत गरजांवर परिणाम होत असेल किंवा सामाजिक प्रतिष्ठेसाठी अनावश्यक खर्च केला जात असेल, तर त्या पद्धतीचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आनंद साजरा करण्यासाठी मोठा खर्च करणे बंधनकारक नाही. साधेपणा, परस्पर सहकार्य आणि सामूहिक आनंद यातूनही सण अधिक अर्थपूर्ण बनू शकतात.समाजाने श्रद्धा आणि अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढी, तसेच ज्ञान आणि अज्ञान यांतील फरक समजून घेतला पाहिजे. निसर्गाचे नियम समजून घेणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, विज्ञानाचा स्वीकार करणे आणि प्रत्येक माणसाच्या प्रतिष्ठेचा आदर करणे, हे प्रगत समाजाचे आधारस्तंभ आहेत.

शेवटी एकच प्रश्न उरतो : सण साजरे करताना आपण माणसाला महत्त्व देतो की केवळ कर्मकांडाला? गरिबाच्या घरात अन्न नसेल, शेतकऱ्याच्या विहिरीत पाणी नसेल आणि तरुणाला रोजगार नसेल, तर समाजाच्या प्रगतीचा उत्सव आपण कोणत्या आधारावर साजरा करणार?माणसाचे कल्याण, विवेक, विज्ञान आणि निसर्गाशी सुसंवाद हेच आपल्या विचारांचे केंद्र असले पाहिजे. कारण परंपरेचा खरा अर्थ जीवन समृद्ध करणे हा आहे; जीवनाला भीतीच्या आणि अनावश्यक बंधनांच्या चौकटीत बंदिस्त करणे नव्हे.

# शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपणे गरजेचे:डॉ.पुरुषोत्तम डाड




नांदेड/प्रतिनिधी- धकाधकीच्या व्यावसायिक जीवनात शारीरिक व मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी नियमित व्यायाम आणि स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध फिजिशियन डॉ. पुरुषोत्तम डाड यांनी केले. हॉटेल चंद्रलोक येथे आयोजित २९ व्या ॲड. बंसीलाल काबरा आयकर-विक्रीकर व्याख्यानमालेच्या अध्यक्षीय समारोपप्रसंगी ते बोलत होते.

मेडिकल असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. संजय कदम यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. यावेळी व्याख्याते सीए प्रीतम बत्रा (नागपूर), ॲड. बालाजी राजे, सीए विजय कालानी, सीए महेश तोतला, ॲड. सी. बी. दागडिया आणि ओमप्रकाश काबरा (छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होते.कै. बंसीलालजी काबरा यांच्या स्मरणार्थ सलग २९ वर्षे आयोजित होणारी ही व्याख्यानमाला व्यापारी, व्यावसायिक, विद्यार्थी आणि करदात्यांसाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे डॉ. डाड यांनी सांगितले. पहिल्या सत्रात सीए प्रीतम बत्रा यांनी जीएसटीमधील बदल, तर दुसऱ्या सत्रात ॲड. बालाजी राजे यांनी आयकर कायद्यातील बदल, नवीन तरतुदी आणि उपाययोजनांवर मार्गदर्शन केले.यावेळी सीए किशन माठोरे (नांदेड) आणि ॲड. शंकर गुंडलवार (परभणी) यांचा सहपरिवार सत्कार करण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ अभ्यासक्रमातील तीन गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.गंगाबिशन कांकर यांनी प्रास्ताविक केले. सीए प्रतीक काबरा यांनी आभार मानले, तर ज्येष्ठ सदस्य रामचंद्र रंगनानी यांनी स्वागतगीत सादर केले. सूत्रसंचालन सीए गोविंद मुंदडा यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ॲड. जयप्रकाश काबरा, हर्षदभाई शहा, सीए प्रवीण पाटील, सीए जयप्रकाश फलोर, शंभुभाई भानु, सीए पी. एच. गट्टानी, संपादक कृष्णा शेवडीकर, उद्योजक अलीभाई पंजवाणी व कमल कोठारी, पत्रकार स. रविंद्रसिंघ मोदी, सीए प्रशांत, गोपाल व प्रतीक काबरा तसेच समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला डीटीएलचे विद्यार्थी, प्राध्यापक, व्यापारी, करसल्लागार आणि सनदी लेखापाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आसना गार्डनमध्ये श्रमदानाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील चैतन्यनगर ते विमानतळ रोड लगतच्या आसना गार्डनमध्ये येत्या रविवारी दि. २५ ऑक्टोबर २०२६ सकाळी ६ ते ७.३० वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या श्रमदानातून गार्डनमधील प्लास्टिक बॉटल, प्लास्टीक पॉकेट, पिशव्या, कागद, काडी, कचरा एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे. या श्रमदान मोहिमेत आसना गार्डनमध्ये दररोज मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या लोकांनी तसेच स्वयंसेवी संस्थाच्या प्रतिनिधींनी आग्रहाने सहभागी व्हावे, असे आवाहन आसना मॉर्निंग वॉकर्स ग्रुपचे अध्यक्ष आनंदराव कल्याणकर यांनी केले आहे. सजक नागरिकांनी आसना गार्डनची दुरावस्था होऊ देऊ नये, असे गार्डन पुन्हा पुन्हा तयार केले जाणार नाही, असे भावनिक आवाहन कल्याणकर यांनी नागरिकांना केले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जिल्ह्यातील शिवसेना आमदाराला मंत्रीपद देणार का?

हदगांव/प्रतिनिधी-माजी मुख्यमंत्री शरद पवार यांनी त्यांच्या मंत्रीमंडळात सर्वसामान्य परिवारातील रामदास आठवले यांना अचानकपणे मंत्रीपद देऊन महाराष्ट्राला आपण कसे पुरोगामी आहोत, हे दाखवण्यासाठी एक सुखद धक्का दिला होता. आता तशीच संधी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आलेली आहे. ते नांदेड जिल्ह्यात सर्वसामान्य परिवारातून आलेल्या त्यांच्या तरुण आमदारांना मंत्रिपदाची संधी देतील का?, या राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

शिवसेना (शिंदे गटात) लवकरच मोठे फेरबदल होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या काही मंत्र्यांच्या कामगिरीवर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. सरकारचा अडीच वर्षांचा कार्यकाळ संपत आला असून, लवकरच शिंदे सेनेतील काही मंत्रीमंडळातून मंत्र्यांना वगळले जाणार असल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेच्या कोणत्या तरुण आमदारांच्या गळयात मंत्रीपदाची माळ पडणार, या चर्चेला रंगत आली असून जर संभाव्य मंत्रीमंडळात बदल



झाला तर हदगाव विधासभा क्षेत्राचे आ. बाबुराव कदम कोहळीकर हे देखील मंत्रीपदाच्या स्पर्धेत प्रबळ दावेदारांपैकी एक आहेत. ते अगदी सामान्य परिवारातील कोणतेही राजकीय वारसा नसलेले आमदार आहेत, पण हदगाव विधानसभा क्षेत्रातील सर्व सामान्य जनतेत ते आपले बाबूराव म्हणून लोकप्रिय आहेत. त्यांना संधी मिळण्याची दाट शक्यता बळावली आहे. यासंबंधी मिळालेल्या माहितीनुसार मंत्रिमंडळाच्या विस्तारात शिवसेनेच्या वाटचाला आरोग्य, पाणीपुरवठा, सामाजिक न्याय, शिक्षण यासारखी अत्यंत महत्त्वाची खाती आलेली आहेत. परंतु, शिंदे सेनेतील विद्यमान मंत्र्यांकडून कामे अपेक्षित असतांना ती होत नाहीत, असे शिवसेनेतील काही जबाबदार पदाधिकाऱ्यांकडून म्हटले जात आहे. आतापर्यंत जेष्ठ मंत्र्यांना पुरेशी संधी देण्यात आली असून, आता नवीन आणि तरुण 'आमदार' चेहऱ्यांना पुढे आणण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पाऊले उचलतील अशी अपेक्षा सेनेच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे. नांदेड जिल्ह्यात शिंदे सेनेचे एकूण चार आमदार आहेत. यामध्ये आ.बाबुराव कदम आणि आ.आनंदराव बोंढारकर हे प्रथमच निवडून आलेले तरुण आमदार आहेत, तर आ.हेमंत पाटील आणि आ.बालाजी कल्याणकर हे जेष्ठ आमदार आहेत.आता नांदेड जिल्ह्याला शिंदे सेनेकडून मंत्रीपदाची संधी मिळाल्यास आ.हेमंत पाटील, आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर आणि हदगाव विधानसभाक्षेत्राचे आ. बाबुराव कदम यांच्यापैकी एकाच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. आ.हेमंत पाटील हे सध्या शिवसेनेतील वजनदार व्यक्तिमत्व असून त्यांच्याकडे हळद संशोधन मंत्री दर्जाचे पद आहे. जर त्यांनी मनाचा मोठेपण दाखवून तसेच मोठ्या भावाची भूमिका वठवली तर निश्चितच शिवसेनेच्या तरुण आमदारांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशी शिवसेनेच्या कार्यकर्त्यात चर्चा ऐकवास मिळत आहे...!

# हिमायतनगर येथे २८ हजार रुपयांचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-हिमायतनगर येथील परमेश्वर मंदिर समोरील रोडवर पोलीसांनी काही इसमास सोमवारी रात्री अटक करुन



गुटखा व दुचाकी असा ५३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

एक इसम दुचाकीवर गुटखा विक्रीसाठी घेवून जात असल्याची माहिती हिमायतनगर पोलीसांना मिळाली. सोमवारी रात्री परमेश्वर मंदिर रोडवर पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे व पोलीस कर्मचाऱ्यांनी बालाजी लक्ष्मण येमलवार (वय २६) रा. कालिका गल्ली, हिमायतनगर यास दुचाकीसह ताब्यात घेतले. त्याच्या जवळून पोलीसांनी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या २८ हजार रुपये किंमतीचा गुटखा व दुचाकी असा ५३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी बालाजी लक्ष्मण येमलवार याच्या विरुध्द विविध कलमान्वये हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




दसऱ्यानिमित्त सचखंड गुरुद्वारा येथुन हल्ला-महल्ला मिरवणूक काढण्यात आली होती. महावीर चौक येथे पारंपारिक हल्ला बोले सो निहालच्या घोषणेत संपन्न झाला. या कार्यक्रमात देशभरातील हजारो भाविक सहभागी झाले होते.

# दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक;१७ दुचाकी जप्त

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर व परिसरात दुचाकी चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना पोलीसांनी अटक करुन दहा लाख रुपये किंमतीच्या १७ दुचाकी पोलीसांनी जप्त केल्या आहेत.

दुचाकी चोरीच्या अनेक घटना घडल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट, प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे फौजदार हनमंत शिंदे व पोलीस कर्मचाऱ्यांनी दुचाकी चोरांचा शोध सुरु केला होता. पोलीसाच्या एका पथकाने गेल्या



आठवड्यात शिवकुमार हनुमान कुऱ्हाळे (वय २८) रा.नायगाव यास अटक केली होती. त्याच्याकडून दहा दुचाकी जप्त केल्या होत्या. मात्र त्याचा साथीदार तुकाराम उर्फ बाळू गंगाधर गिरी (वय २५) रा.टाकळगाव ता.नायगाव हा पोलीसांची चाहुल लागल्यामुळे खानापूर फाटा येथुन फरार त्याच्या मागावर होते. पुणे व इतर ठिकाणी जावून त्याचा शोध घेतला असता तो पोलीसांना सापडला. पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून त्याची कसुन चौकशी केली असता त्याने दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. पोलीसांनी त्याच्या जवळून वेगवेगळ्या ठिकाणी विक्री केलेल्या व लपून ठेवलेल्या सतरा दुचाकी जप्त केल्या आहेत.

# ज्ञानतीर्थ युवक महोत्सवाच्या नियोजनाचे कुलगुरुंकडून कौतुक

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानतीर्थ केंद्रीय युवक महोत्सवात ११० महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला आहे.

महोत्सवासाठी आलेल्या पाचशेहून अधिक विद्यार्थी कलाकार आणि प्राध्यापकांच्या निवास व भोजनाची व्यवस्था सायन्स कॉलेजने केली आहे. या व्यवस्थेची कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आयोजकांचे कौतुक केले.



विद्यार्थ्यांच्या निवासासाठी मुलांचे वसतिगृह, कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत, भौतिकशास्त्र विभाग, नरहर कुरुंदकर प्रतिष्ठान आणि सोसायटीच्या सभागृहात व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी स्वच्छता, वीज, पिण्याचे पाणी आणि सुरक्षिततेच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कुलगुरू डॉ. चासकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून निवास, स्वच्छता, पाणी आणि भोजन व्यवस्थेबाबत अभिप्राय घेतला. विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केल्यानंतर त्यांनी व्यवस्थापन समितीच्या कामाचे कौतुक केले.प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे आणि संयोजन सचिव प्रशांत सूतकर यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रा. राजेश आचेगावे यांच्या नेतृत्वात नियोजन करण्यात आले. प्रा. कार्तिक जाधव, प्रा. आकाश करंडे, प्रा. जयंत जोशी, प्रा. अक्षय वडजे, प्रा. कपिल धुतमल, प्रा. नरसिंग भालके, प्रा. निलेश शर्मा, प्रा. प्रशांत दुरनाळे, प्रा. नागेश कोल्हे, डॉ. कवडे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व्यवस्थेसाठी परिश्रम घेतले.

# पदवीधर मतदारसंघ निवडणुकीनिमित्त मद्यविक्रीची दुकाने बंद

नांदेड/प्रतिनिधी-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक अंतर्गत नांदेड जिल्ह्यात मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषद औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूकचा कार्यक्रम घोषित केला असून, दि. २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडणे, आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, खर्चावर नियंत्रण ठेवणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे तसेच सार्वजनिक शांतता अबाधित राखणे या उद्देशाने हा आदेश जारी करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार नांदेड जिल्ह्यातील मद्यविक्रीची दुकाने दि. २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजेपासून दि. २३ ऑक्टोबर या कालावधीत मतदान संपण्यापूर्वी ४८ तास अगोदर, मतदानाच्या पूर्वीचा दिवस व मतदानाच्या दिवशी बंद ठेवण्यात येणार आहेत. वरील कालावधीत नांदेड जिल्ह्यातील संबंधित मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवणे बंधनकारक राहील. या आदेशाचे उल्लंघन करून मद्यविक्री सुरू असल्याचे आढळून आल्यास संबंधित अनुज्ञप्ती रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **SHAIKH ZAFAR SHAIKH AHMED** which now I am, changing as (new name) **SHAIKH ZAFAR SHAIKH AHMAD**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address
9-5-1241,Hilal Nagar,Degloor Naka,
Nanded-431604
M.No.- 9890412183

## जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील श्रीमती के.एच.लोहगांवकर,प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांच्या न्यायालयात

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१२०/२०२६

अर्जदार:- वैष्णव पि.गोविंद साखरे वय-२० वर्षे, धंदा-शिक्षण रा.कामठा बु.ता.अर्धापुर जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार :- जन्म मृत्यू नोंदणी निबंधक/ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय कामठा बु.ता.अर्धापुर जि.नांदेड

विषय:- जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम,२०२६ कलम १३३ (अ) अन्वये.

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी अर्जदार नामे वैष्णव पि.गोविंद साखरे जन्म दि.२२/११/२००६ रोजी राहत्या घरी कामठा बु. ता. अर्धापुर जि.नांदेड येथे जन्म झाला आहे.

तरी या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.०१/१२/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
अर्धापुर

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अर्धापुर

# माहूर गडावर सिमोल्लंघनाने नवरात्र उत्सवाची सांगता

माहूर/प्रतिनिधी-महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण पीठ असलेल्या माहूर गडावरील श्री रेणुका देवीच्या नवरात्र उत्सवाची मंगळवारी (ता.२०) विजयादशमीला भगवान परशुरामाची पालखी काढून वरदाईच्या डोंगरावर सिमोल्लघन करून सुवर्णरूपी आपटा आणून श्री रेणुका देवीला अर्पण करण्यात आले त्यानंतर श्री रेणुका देवी व भगवान परशुरामाची महाआरती करून नवरात्र उत्सवाची सांगता करण्यात आली.

श्री रेणुका देवीचा नवरात्र उत्सव गेल्या नऊ दिवसापासून मोठ्या उत्साहात व भक्ती भावात गडावर साजरा करण्यात आला श्री रेणुका देवी संस्थान विश्वस्त समितीने उत्सवाची जय्यत तयारी केली होती. संस्थांनच्या अध्यक्षा तथा धर्मदाय सहआयुक्त श्रीमती हिरा शेळके, सहाय्यक जिल्हाधिकारी बी सरवनन, तहसीलदार अभिजीत जगताप, उप विभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांनी उत्सवाकरिता विशेष लक्ष दिले आहे. नऊ दिवस धार्मिक कार्यक्रमासह भरगच्च संगीत सेवेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या संगीत सेवेत राज्यातील नामवंत गायक,संगीतकार यांनी गायन,नृत्य सेवा सादर केली. मंगळवारी विजयादशमी निमित्त श्री रेणुका देवीची विधिवत पूजा अभिषेक करण्यात आला देवीला सुवर्ण अलंकार चढवून, पायस नैवेद्य दाखवून देवीची महाआरती विश्वस्त चंद्रकांत भोपी, विश्वस्त संजय कान्नव यांनी केली. दुपारी साडे पाच वाजता श्री रेणुका देवी मंदिर परिसरातील श्री महालक्ष्मी मंदिरासमोर शस्त्र पूजन करण्यात



आले त्यानंतर भगवान परशुरामाची पालखी तयार करून त्यात भगवान परशुराम यांना विराजमान करून पालखी वरदायी डोंगरावर मार्गस्थ झाली त्या ठिकाणी सिमोल्लघन करून सुवर्णरूपी आपटा आणून श्री रेणुका देवीला अर्पण करण्यात आले त्यानंतर श्री रेणुका देवी व भगवान परशुरामाची महाआरती करून नवरात्र उत्सवाची सांगता करण्यात आली.

# रुग्ण सेवा मंडळातर्फे मोफत नेत्र व रक्तगट तपासणी शिबिर संपन्न

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहर व परिसरातील गरीब व गरजू शेतकरी-शेतमजूर लोकांना नाममात्र दरात आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हनुण जेष्ठ ऋदयरोगतज्ञ तथा माज़ी ख़ा.डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या मार्गदर्शनाख़ाली कार्य करणा-या रुग्ण सेवा मंडळ या संस्थेंने मागील ४९ वर्षात हजारो गरीब लोकांच्या जीवनात आनंद फुलविन्याचे कार्य केले आहे.

मराठवाड्यातील आरोग्य सेवा देनारी जूनी व दानशूर लोकांच्या दानावर चालनारी एक महत्वपूर्ण संस्था असुन २०२६-२०२७ हे वर्ष रूग्ण सेवा मंडळाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्य रुग्ण सेवा मंडळ व देगलूर महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यासाठी मोफ़त मोफत नेत्र व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ११३ विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी तर ४४ विद्यार्थ्याची रक्तगट तपासणी करन्यात आली. या मोफ़त शिबिर प्रसंगी रुग्ण सेवा मंडळाचे उपाध्यक्ष देवेंद्र मोतेवार, सचिव सूर्यकांत नारलावार, देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार उपस्थित होते.प्रस्तुत शिबिर यशस्वी करन्यासाठी रुग्ण सेवा मंडळाचे सहसचिव प्रा.डॉ.बालाजी कत्तुरवार व प्रा.विठ्ठल गुंडया चिंतावार, कार्यकारी मंडळ सदस्य रमेश नारलावार, मारुती गायकवाड, विजय चालिकवार व प्रा.अशोक टिपरसे प्रा. विठ्ठल जंबाले, प्रा. विनय भोगले, प्रा.संजय देबडे, प्रा सर्जेराव रणखांब, प्रा. व्यंकट खंदकुरे यांनी परिश्रम घेतले केले आहे.

# कौटुंबिक न्यायालयाच्या प्रबंधकपदी श्रीमती मीनादेवी खांडरे

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा न्यायालय, कंधार येथे अधीक्षक पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती मीनादेवी संभाजी खांडरे यांची नांदेड येथील कौटुंबिक न्यायालयाच्या प्रबंधकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाशी संलग्नीत नांदेड जिल्हा तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेच्या त्या सक्रीय सदस्य असून विशेष म्हणजे नांदेड येथील कौटुंबिक न्यायालयाच्या प्रबंधकपदी विराजमान होणाऱ्या त्या प्रथम महिला प्रबंधक आहेत. अत्यंत प्रतिकुल अशा परिस्थितीतुन प्रबंधकपदावर गवसणी घातल्यामुळे त्यांचे नांदेड जिल्हा तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेतर्फे स्वागत करण्यात आले.

# राजकीय नेत्यांवरही प्राणघातक हल्ल्याची शक्यता-खा.संजय राऊत

मुंबई/प्रतिनिधी-बॉलिवूडमधील कलाकारांवर हल्ले होत असताना आगामी काळात राजकीय नेतेही लक्ष्य होऊ शकतात, असा गंभीर दावा खा.संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत केला. तसेच, येत्या काही महिन्यांत केंद्रातील राजकीय परिस्थितीत मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर निशाणा साधला.

देशात घडणाऱ्या गोळीबार, हल्ले आणि हत्यांच्या घटनांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खा.संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेवून भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आगामी काळात अनेक राजकीय घडामोडी घडतील, काही महत्त्वाच्या फाईल्स उघड होतील आणि सरकारविरोधातील जनतेचा असंतोष अधिक तीव्र होईल. सध्या केंद्र सरकारची परिस्थिती कमकुवत होत असल्याचा दावाही त्यांनी केला. सरकार बदलण्याची प्रक्रिया सध्या संथ वाटत असली, तरी अचानक वेग घेऊ शकते, असे ते म्हणाले.लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या कारवायांचा संदर्भ देत राऊत यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. विविध राज्यांतील गुन्ह्यांच्या तपासासाठी लॉरेन्स बिश्नोईची कोठडी मिळवण्याची मागणी संबंधित पोलिसांकडून करण्यात आल्याचे सांगत, साबरमती कारागृहात बंदिस्त असलेल्या बिश्नोईला इतर राज्यांच्या पोलिसांकडे तपासासाठी का सोपवले जात नाही, असा सवाल त्यांनी केला. या मुद्द्यावरून अमित शाह यांच्यावरही त्यांनी गंभीर आरोप केले. गायक सिद्धू मूसेवाला यांची हत्या, बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण आणि अभिनेता सलमान खान याच्याशी संबंधित धमकीच्या प्रकरणांचा उल्लेख करत राऊत यांनी बॉलिवूडमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले जात असल्याचा आरोप केला. आगामी काळात लॉरेन्स बिश्नोईच्या नावाखाली विरोधी पक्षांतील नेत्यांवर हल्ले होऊ शकतात, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

# आर्णीजवळ कार अपघातात मदनापूरच्या तरुणाचा मृत्यू





माहूर/प्रतिनिधी- धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त यवतमाळ जिल्ह्यातील कळंबजवळ असलेल्या चापर्डा येथील ज्ञानभूमीला भेट देऊन माहूरकडे परतणाऱ्या मदनापूर येथील सात जणांच्या कारला नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर आर्णी शहराजवळील दत्तरामपूर येथे मंगळवारी (ता. २०) रात्री भीषण अपघात झाला. या अपघातात सातही जण जखमी झाले असून, गंभीर जखमी झालेल्या रोहन संजय मुजमुले यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. अन्य दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

माहूर तालुक्यातील मदनापूर येथील रोहन संजय मुजमुले, संदेश माणिक मुजमुले, दिशांक मुजमुले, जीवन लांडगे, गणेश रामटेके आणि आदित्य मेढे यांच्यासह सात जण एमएच ४२ एएच ११६४ क्रमांकाच्या आर्टिका कारने चापर्डा येथील ज्ञानभूमीला गेले होते. तेथून परत येत असताना दत्तरामपूरजवळ कार चालकाला रस्त्याचा अर्धवट भाग लक्षात न आल्याने वाहनावरील नियंत्रण सुटल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यानंतर कारने तब्बल चार पलट्या घेतल्या. अपघाताची तीव्रता एवढी होती की, कारमधील सातही जण जखमी झाले. अपघातानंतर जखमींना तातडीने आर्णी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना यवतमाळ येथे हलविण्यात आले. गंभीर जखमी असलेल्या रोहन संजय मुजमुले यांचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला. बुधवारी (ता. २१) दुपारी तीन वाजताच्या सुमारास मदनापूर येथे त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे मदनापूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# माहूर ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर



माहूर/प्रतिनिधी-माहूर ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे आणि अपुऱ्या मनुष्यबळामुळे आरोग्यसेवेवर निर्माण झालेल्या ताणाचा प्रश्न अखेर आरोग्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यापर्यंत पोहोचला आहे. सोमवारी माहूरगडावर आलेल्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांना नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांनी यासंदर्भात निवेदन सादर केले. निवेदनाची दखल घेत मंत्र्यांनी नांदेडच्या जिल्हा शल्यचिकित्सकांना आवश्यक सूचना दिल्याने रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याच्या प्रश्नाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

माहूर हा आदिवासीबहुल आणि दुर्गम तालुका असून, परिसरातील गोरगरीब नागरिकांसाठी ग्रामीण रुग्णालय हे आरोग्यसेवेचे महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांचे पद २० जानेवारी २०२६ पासून रिक्त आहे. सहाय्यक अधीक्षकांचे पदही अनेक महिन्यांपासून रिक्त असून, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णसेवेवर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यातच सातपैकी पाच अधिपरिचारिकांना बदलीनंतर पर्यायी व्यवस्था न करता कार्यमुक्त करण्यात आल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढला आहे. परिणामी, रुग्णालयातील आरोग्यसेवा सुरळीत चालविताना अडचणी निर्माण होत असून, रुग्णांना आवश्यक सेवा वेळेत मिळण्याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर रिक्त पदे तातडीने भरणे, अतिरिक्त अधिपरिचारिका उपलब्ध करून देणे आणि जिल्हा शल्यचिकित्सकांच्या कार्यपद्धतीची चौकशी करणे, अशा मागण्या नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी निवेदनातून केल्या आहेत. मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी या प्रश्नाची दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सकांना आवश्यक सूचना दिल्याने आता प्रत्यक्ष कार्यवाहीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.




धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर महावंदना कार्यक्रम आदरणीय भिक्खु संघ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# २ ते १६ नोव्हेंबर शाळा,कॉलेजला दिवाळीच्या सुट्या

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील मान्यताप्राप्त खासगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सोमवार, २ नोव्हेंबर ते शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दिवाळीची सुट्टी राहणार असून, सोमवार, १६ नोव्हेंबरपासून शाळा पुन्हा सुरू होणार आहेत. या सुट्टीचा लाभ अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनाही मिळणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम सत्र १५ जूनपासून सुरू झाले असून, ते ३१ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. त्यानंतर दिवाळीच्या सुट्टीला सुरुवात होईल. सुट्टीचा कालावधी निश्चित झाल्याने विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना सणासुदीचे तसेच प्रवासाचे नियोजन करता येणार आहे.दिवाळीची सुट्टी संपल्यानंतर १६ नोव्हेंबरपासून द्वितीय सत्र सुरू होईल. हे सत्र १ मे २०२७ पर्यंत चालणार असून, त्यानंतर ३ मे ते १४ जून २०२७ या कालावधीत उन्हाळी सुट्टी राहणार आहे. आगामी शैक्षणिक वर्ष २०२७-२८ हे १५ जून २०२७ पासून सुरू होणार आहे.माध्यमिक शाळा संहितेतील नियमानुसार, शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या सुट्ट्या ७६ दिवसांपेक्षा अधिक होणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण व्हावा, यासाठी वर्षभरात किमान २३० कार्यदिवस असणे आवश्यक आहे.शाळांना संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांच्या परवानगीने उन्हाळी किंवा दिवाळीच्या दीर्घ सुट्टीचे समायोजन करून गणेशोत्सव अथवा नाताळच्या काळात सुट्टी देण्याची मुभा राहणार आहे. तसेच मुख्याध्यापकांच्या अखत्यारीतील तीन स्थानिक सुट्ट्यांची नोंद शिक्षणाधिकाऱ्यांकडे करणे बंधनकारक आहे.

# कै.शंकर क्षीरसागर यांच्या कुटुंबीयांचे आ.चिखलीकर यांनी केले सांत्वन



नांदेड/प्रतिनिधी-बोरगाव (ते.) ता. जि. नांदेड येथील शेतकरी कै. शंकर आबनराव क्षीरसागर यांनी शेतीतील विविध संकटे, महावितरणकडून वीज कनेक्शन तोडण्यात आल्याने उभ्या हळदीच्या पिकाचे झालेले नुकसान, कर्जमाफीपासून वंचित राहावे लागणे आणि मुलीच्या शिक्षणाचा आर्थिक भार अशा अनेक अडचणींमुळे व्यथित होऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या दुःखद घटनेची माहिती मिळाल्यानंतर आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी बोरगाव येथे जाऊन कै. शंकर क्षीरसागर यांच्या कुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी शोकाकुल कुंबीयांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला आणि त्यांच्या दुःखात सहभागी होत कुंबीयांप्रति संवेदना व्यक्त केल्या.शेती हा ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार आहे. मात्र, नैसर्गिक व आर्थिक संकटे, शेतीसाठी आवश्यक सुविधांमधील अडचणी आणि कर्जाचा वाढता भार यामुळे शेतकरी कुंबांसमोर गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. कै. शंकर क्षीरसागर यांच्या निधनाने शेतकरी कुंबांपुढील अडचणींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.यावेळी माधव पावडे, साहेबराव धनगे, नेताजीराव भोसले, संतोष क्षीरसागर, गणेशराव पाटील मरळकर, बोरगावचे सरपंच अनिल पाटील बोरगावकर, विलास पाटील सूर्यवंशी, अर्जुन पाटील क्षीरसागर, सुनील पाटील धुमाळ, तिरुपती पाटील क्षीरसागर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# बहुजनांच्या शिक्षणाचे शिल्पकार भाऊसाहेब देशमुख:प्रा.डॉ.सोनटक्के



नांदेड/प्रतिनिधी-बहुजन, शेतकरी आणि वंचित समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. कुसमेंद्र सोनटक्के यांनी केले.

पीपल्स महाविद्यालय, नांदेड आणि य. द. व. देशमुख महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने भाऊसाहेब देशमुख यांच्या १२८ व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. बहुजनांच्या शिक्षणाचे शिल्पकार डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हा व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी पीपल्स महाविद्यालयाचे प्राचार्य विकास सुकाळे होते.शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विषमता दूर करून सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे, हा भाऊसाहेब देशमुख यांच्या कार्याचा प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य आणि सामाजिक जाणीव विकसित करून महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत, असे आवाहन डॉ. सोनटक्के यांनी केले. उपप्राचार्य विशाल पतंगे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भगवान जाधव यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. संदीप गायकवाड यांनी आभार मानले.

# विद्यापीठाच्या गेटसमोर दुचाकीस्वारास लुटले

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या गेट समोर सोमवारी सकाळी तीन जणांनी दुचाकीस्वारास अडवून लुटल्याची घटना सोमवारी सकाळी घडली आहे.

धोंडीबा शंकरराव बासटवार (वय ४२) रा.गुरुजी चौक, पूर्णा रोड, नांदेड हे सोमवारी सकाळी बहिणीसोबत दुचाकीवर जात असतांना स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या गेट समोर अज्ञात तीन जणांनी बासटवार यांची दुचाकी अडविली. बासटवार यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यांच्या जवळून मोबाईल व त्यांच्या बहिणीच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र असा २३ हजार रुपयांचा ऐवज घेवून आरोपी स्कुटीवर पळून गेले. धोंडीबा बासटवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात तीन आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस जमादार वाघमारे हे करीत आहेत.

# मरखेल येथे केळीच्या शेतात तरुणाचा मृतदेह आढळला

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील वळग येथील शिवाजी काशिनाथ सूर्यवंशी (वय ३२) याचा मृतदेह मरखेल येथील शिवाजी पाटील यांच्या शेतात चिखलामध्ये आढळुन आल्याने या परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना नेमकी कशी घडली. याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार शिवाजी माणिकराव सूर्यवंशी हे वळग ता. देगलूर येथील रहिवासी होते. शिवाजी पाटील यांच्या केळीच्या शेतात चिखलामध्ये मृतअवस्थेत आढळून आले. या घटनेची माहिती समोर आल्यानंतर परिसरात चर्चा सुरू झाली आहे. शिवाजी सूर्यवंशी यांचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याचा उलगडा तपासानंतरच होणार आहे. दरम्यान या घटनेमुळे वळग आणि परिसरात हळूहळू व्यक्त केली जात आहे.

# मुदखेड येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड शहरात विविध ठिकाणी ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात मंगळवारी साजरा करण्यात आला.

यावेळी भन्ते गगनबोधी यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच पंचशील ध्वज फडकावून धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमातून भगवान बुद्धांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि करुणेच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भारतीय बौद्ध समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक दिवस मानला जातो. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेमुळे भारतीय समाजात समता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या मूल्यांना नवी दिशा मिळाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून जातिभेद, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमतेविरुद्ध लढ्याला वैचारिक बळ दिले. तथागत गौतम बुद्धांनी दिलेला प्रज्ञा, शील आणि करुणेचा संदेश आजही समाजाला योग्य दिशा देणारा आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक परिवर्तन, बंधुभाव आणि मानवतेच्या मूल्यांचा जागर करणारा दिवस आहे.मुदखेड शहरातील विविध भागांत आयोजित या कार्यक्रमांमुळे बौद्ध धम्माच्या विचारांना उजाळा मिळाला. यावेळी समता सैनिक दल बौद्ध उपासक उपासिका बालक बालीका, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरुन

## पाचशे कोटी रुपये दिल्याचे...

गेल्या अनेक दशकांपासून मराठा समाजाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना जे करता आले नाही, ते आम्ही करून दाखवले, असा दावा त्यांनी यावेळी केला. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी किंवा इतर कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी केले नाही किंवा कोणाचे आरक्षण काढून घेतले नाही, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना या प्रक्रियेला सुरुवात झाली होती आणि आजही आरक्षण टिकून आहे, असेही ते यावेळी म्हणाले. मनोज जरांगे यांनी समाजाच्या प्रश्नांसाठी काम करावे, त्यांच्या आंदोलनाचा राजकीय व्यासपीठ म्हणून वापर करू नये, असा सल्ला त्यांनी जरांगेंना दिला आहे.

## प्रशासन मतदानासाठी...

देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी सतर्क राहावे. मतदानाच्या दिवशी उद्भवणाऱ्या संभाव्य अडचणींवर तातडीने उपाययोजना कराव्यात आणि सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखावा, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी दिले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४